जाहिरात

**महाराष्ट्र शासन**

**जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त, गडचिरोली**

**ई-निविदा सुचना (E-Tendering) 2025-2026**

---

## द्रवनत्र व विर्यमात्रा वाहतुक

गडचिरोली जिल्हा अंतर्गत व जिल्ह्याबाहेर आवश्यकता भासल्यास पर राज्यांतुन लागणारे द्रवनत्र व विर्यमात्रा वाहतुकीकरीता दिनांक 01/07/2025 ते 30/06/2026 या एका वर्षाच्या कालावधीसाठी वाहतुक कंत्राटदाराकडुन ई-निविदा प्रणालीद्वारे मार्गविण्यात येत आहे. ईच्छूक कंत्राटदारानी महाराष्ट्र शासनाचे ई-निविदा संकेत स्थळ **http://mahatender.gov.in** किंवा **http://maharashtra.gov.in** वर ई-निविदा क्र. **2025_CAHP_1184590 _1** वर संपूर्ण ई-निविदा संबधी माहिती उपलब्ध आहे. दिनांक- 28/05/2025 सकाळी 11.00 वाजेपासुन ते दिनांक -06/06/2025 रोजी संध्याकाळ 5.00 वाजेपर्यत प्रणालीद्वारे भरण्याची मुदत ठेवण्यात आली असुन दिनांक -11/06/2025 रोजी 11.00 वाजता नंतर ई- निविदा उघडण्यात येईल.

अध्यक्ष

निविदा समिती

**तथा**

**जिल्हा उपआयुक्त पशुसंवर्धन गडचिरोली**

महाराष्ट्र सत्यमेव जयते शासन
कार्यालय जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त, गडचिरोली
चामोर्शी रोड, पोष्ट ऑफीस समोर, गडचिरोली (४४२६०५)
दुरध्वनी क्र. ०७१३२ – २३३३६१ ई-मेल- ddcah.gadchiroli@gmail.com
जावक्र क्र. जिपउआ/गड/ई-निविदा वाहतुक/ 2037 /२०२५, गडचिरोली दिनांक- 27 /05/२०२५

---

# // द्रवनत्र व गोठीत रेतमात्रा वाहतुक ई-निविदा सन 2025-26 करीता नियम व अटी //

1) संपुर्ण ई-निविदा प्रक्रिया ऑनलाईन असून दोन लिफापा (तांत्रीक व व्यापारी) पध्दतीचा अवलंब करुन पार पाडण्यात येईल व निविदा संबधीत संपुर्ण सुचना, नियम व अटी शासनाचे ई-निविदा संकेतस्थळ http://mahatenders.gov.in वर प्रकाशित करण्यात येईल.
2) निविदा फार्म तसेच नियम व अटी या http://mahatenders.gov.in संकेतस्थळावरुन प्राप्त होतील तसेच निविदा फार्म करीता रुपये 3800/- व अनामत रक्कम 19000/- हि नेट बॅकींगव्दारे भरणा करावे लागेल. सदरची रक्कम रोखीने / धनादेश / धनाकर्षाव्दारे स्विकारल्या जाणार नाही.
3) सदर ई-निविदा धारकाने अथवा त्यांचे प्रतिनिधीच्या उपस्थितीत ई-निविदा समितीसमोर उघडण्यात येईल व निविदा समितीचा निर्णय अंतिम व निविदा धारकास बंधनकारक राहील.
4) निविदा धारकाने निविदे सोबत आपल्या वाहनाची सांक्षाकीत केलेली कागदपत्रे (उदा. वाहन नोंदणी प्रत, वाहन रस्तारकर पावती, वाहन वाहतुक फिटनेस सर्टिफिकेट, पीयुसी प्रमाणपत्र, इंन्शुरंस कॉपी, सामान वाहतुक परमिट इ.) स्कॅन करुन ऑनलाईन सादर करावे व निविदा सभेच्यावेळी मुळ प्रति पडताळणी करीता सादर कराव्यात.
5) तांत्रीक लिफाप्यामधील सर्व कागदपत्राची पुर्तता व पडताळणी अंति योग्य असणाऱ्या निविदा धारकाचे व्यापारी लिफापा उघडण्यात येईल.
6) कंत्राटदार ज्या वाहनाने वाहतुक करणार आहे ते वाहन त्याच्या स्वत:च्या मालकीचे असावे. वाहन वाहतुकीच्यावेळी सुस्थितीत असावे वाहन वारंवार बिघडल्याने जर द्रवनत्र पुरवठा करण्यास दिरंगाई झाली तर कंत्राटदारास नोटीस बजावण्यात येईल. आणि वेळ प्रसंगी त्याचा करार रदद करण्याचे संपुर्ण अधिकार जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त यांना राहतील.
7) द्रवनत्र वाहतुक करारात जे वाहन करारबध्द झाले असेल तेच वाहन सुस्थितीत वाहतुकीकरीता वापरण्यात येईल. वाहनात त्रृटी दिसुन आल्यास वाहन परत करण्यात येईल त्यासाठी वाहन मालक जबाबदार राहील.
8) वाहतुकीसाठी वापरण्यात येणारे वाहनास ऊन, वारा, पाऊस यापासून द्रवनत्र पात्रे सुरक्षित राहतील याकरीता हुड ठेवावे लागेल. व वाहनास द्रवनत्र पात्राखाली रबर मॅटीन लावावे लागेल. द्रवनत्र वाहतुक व पुरवठा करीता वापरण्यात येणारे वाहन हे सुस्थितीत असावे. तसेच निविदा उघडण्याच्या दिवशी समिती समोर तपासणीसाठी वाहन उपलब्ध करावे व ई-निविदा समिती यावर अंतिम निर्णय घेईल.
9) द्रवनत्र पात्र वाहतुकीच्या वेळेस गाडीचा वेग दर ताशी 30 ते 36 कि.मी. पेक्षा जास्त राहु नये जास्त वेगाने गाडी नेल्यास होणाऱ्या नुकसानीच्या भरपाईची जबाबदारी वाहतुक कंत्राटदारावर राहील.
10) वाहनामध्ये चालकाच्या जवळ दोन व्यक्ती बसण्याची व्यवस्था असावी व खाली रबर मॅटींन असावे. वाहतुकीच्या वेळेस कार्यालयाचे एक किंवा दोन प्रतिनिधी सोबत राहतील.
11) वाहन वाहतुकीच्या सेवेत असताना वाहनाची हलचल वाहनासोबत असलेल्या अधिकारी / कर्मचारी यांच्या आदेशाप्रमाणे करावी लागेल. वाहनात खाजगी सामान किंवा इतर प्रवाशांची वाहतुक करता येणार नाही तसेच वाहन चालक यांची वागणूक चांगली असावी. दारु पिऊन वाहन चालवु नये तसे केल्यास मंजुर झालेली निविदा खंडीत करण्याचे अधिकार कार्यालय प्रमुखांना राहील.

12) वाहतुक करीत असताना वाहन परिवहन नियम विषयक नियमांचे किंवा पोलीस कायद्यानुसार नियमाचे उल्लघन झाल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी कंत्राटदाराची राहील व वाहन जप्त किंवा इतर कार्यवाहीसाठी खोंळबुन ठेवल्यास वाहतुकीसाठी दुसरे पर्यायी वाहन उपलब्ध करुन द्यावे लागेल.

13) प्रत्येक वाहतुकीच्या वेळी द्रवनत्र पात्रे वाहन चालकाच्या ताब्यात देण्यात येईल व ती व्यवस्थीत ठेवण्याची जबाबदारी वाहन चालकाची राहील. वाहतुकीच्या वेळी निष्काळजी पणामुळे द्रवनत्र पात्राचे नुकसान झाल्यास त्याची किंमत कंत्राट दाराकडुन त्याच्या देयकातुन वसूल केल्या जाईल.

14) वाहनात द्रवनत्र पात्र चढविणे, उतरविणे व उपकेंद्रापर्यंत पोहचविण्याची व्यवस्था कंत्राटदाराला करावी लागेल. या करीता वेगळा दर आकारता येणार नाही. तसेच रात्रीच्या मुक्कामाचा वेगळा दर आकारता येणार नाही.

15) द्रवनत्र वाहतुकीच्या मार्गावर कृत्रिम रेतन उपकेंद्राचे / पशुवैद्यकीय दवाखान्याचे शासकीय सामान विनामुल्य वाहतुक करणे बंधनकारक राहील.

16) द्रवनत्र वाहतुकीच्या वेळेस पथकर / रोडटॅक्स व इतर शासकीय सर्व टॅक्स वाहतुक कंत्राटदाराला द्यावा लागेल.

17) कोणत्याही कारणास्तव वाहतुकीचा संप झाल्यास त्याकरीता या कार्यालयाच्या कार्यक्रमाच्या पत्रासह निविदा धारकाने पोलीस सरंक्षण उपलब्ध करुन घेणे आणि द्रवनत्र वाहतुक सुरळीत करुन घेणे ही जबाबदारी कंत्राटदाराची राहील कारण या सेवा अत्यावश्यक आहे.

18) ज्या कंपनीसोबत महाराष्ट्र पशुधन विकास मंडळाव्दारे द्रवनत्र खरेदीचा भावबंद करार होईल त्या ठिकाणावरुन द्रवनत्र उचल करावे लागेल. मध्यप्रदेश किंवा इतर राज्यातुन द्रवनत्र व जनावरे आणण्याकरीता आंतरराज्य परिवहन अधिकाऱ्याचे लायसंन्स / परमिट प्राप्त करण्याची जबाबदारी कंत्राटदाराची राहील. तसेच अत्यावश्यक व आणिबाणीच्या परिस्थितीत द्रवनत्र महाराष्ट्र किंवा इतर राज्यातुन अन्य कंपनीकडुन आणावे लागेल.

19) द्रवनत्र पुरवठयाकरीता ज्या ज्या वेळेस हे कार्यालय वाहन मागणी करेल त्या त्या वेळेस कंत्राटदारास वाहन पुरवठा करणे बंधनकारक राहील. जर नमुद वेळेस वाहन पुरवू शकले नाही तर हे कार्यालय बाजारात उपलब्ध असलेल्या दराने वाहन मागवुन द्रवनत्र पुरवठा करेल व दारातील फरक वाहतुक कंत्राटदराकडुन वसुल करण्यात येईल. वाहन पुरवण्यिास वारंवार खोळंबा निर्माण झाल्यास अनामत रक्कम जप्त करण्यात येईल.

20) द्रवनत्र पुरवठा हा प्रत्येक मार्गावरील उपकेंद्राना वेळेवर होणाच्या दृष्टीने वाहन या कार्यालयात पुर्व सुचनेनुसार सुचित केलेल्या वेळेवर आणावे लागेल. वाहनाचे मिटर चालु असणे आवश्यक आहे. काही कारणास्तव मिटर बंद झाले तर त्वरीत दुरुस्त करुन घ्यावे लागेल. व त्या कालावधी पर्यंत प्रत्येक मार्गाचे असलेले ठराविक कमीतकमी अंतराचे देयक मंजुर करण्यात येईल.

21) 01 जुलै 2024 ते 30 जुन 2025 या कालावधीत डिझेल इंधन इत्यादीची भाववाढ झाली तरी मंजुर निविदा दरात कोणतीही दरवाढ मिळणार नाही.

22) ज्यांची निविदा मंजुर होईल त्यास मंजुरी आदेश प्राप्त झाल्यानंतर त्या दिवसापासून 7 दिवसाचे आत संपुर्ण वर्षाचा वाहतुकीच्या्या संभाव्य देय रकमेच्या 3 टक्के रक्कम सुरक्षाठेव म्हणून या कार्यालयास भरावी लागेल व रितसर रुपये 100/- च्या स्टॅम्प पेपरवर करारनामा लिहुन द्यावा लाागेल.

23) ज्याची निविदा मंजुर होणार नाही त्यास निविदेसोबत भरलेली अनामत रक्कम परत करण्यात यईल.

24) निविदा मंजुर / नामंजुर करण्याबाबतचा अंतिम निर्णय तसेच निविदा संदर्भातील कोणत्याही अडचणीबाबतचा अंतिम निर्णय मा. प्रादेशिक सहआयुक्त पशुसंवर्धन, नागपूर विभाग, नागपूर यांचा राहील.

25) वाहतुकीच्या देयकाची रक्कम देयक सादर केल्यापासून शक्यतो 45 दिवसाचे आत अदा करण्यात यईल.

26) आयकर अधिनियिम 1961 सेक्शन 194-सी अन्वये कंत्राटदाराचे दर महिन्याच्या देयकातुन 2 टक्के आयकर रक्कम कपात केली जाईल किंवा आयकर अधिनियमाप्रमाणे वेळोवेळी होणाऱ्या बदलानुसार कपात करण्यात येईल.

27) कंत्राटदारास कोणत्याही प्रकारची आगावु रक्कम अथवा अग्रीम देण्यात येणार नाही. तसेच कंत्राटदाराला कोणत्याही प्रकारची अट कार्यालयावर लादता येणार नाही.

28) कार्यालयाच्या लेखी आदेशान्वये द्रवनत्र पुरवठा करणारे वाहन द्रवनत्र पुरवठा कामा व्यतीरिक्त कार्यालयाचे अन्य कामाकरीता जिल्हयाबाहेर किंवा राज्याबाहेर न्यायचे झाल्यास मंजुर वाहतुक दरानुसारच नेन्यात येईल.

29) कंत्राटदारास मान्य दराने द्रवनत्र व रेतमात्रा वाहतुक करण्याव्यतीरिक्त पशुसंवर्धन खात्याचे लसमात्रा, वैरण बियाणे, औषधी व विभागीय व्यवस्थापक, शासकीय गोठीत रेतमात्रा निर्मीती केंद्र नागपूर या कार्यालयातुन गोठीत रेतमात्रा व इतर आवश्यक शासकीय साधन सामुग्रीची वाहतुक करावी लागेल.

30) दिनांक 30 जुन 2026 नंतर अत्यावश्यक प्रसंगी निविदेला काही तांत्रीक व प्रशासकीय अडचणीमुळे मंजुरी प्राप्त झाली नाही तर पुढील 3 महिने पुर्वीच्याच दराने वाहतुक करावी लागेल.

31) निविदा भरताना निविदा धारकास नियम व अटी संपुर्ण वाचुन व त्या समजुन त्या पुर्ण मान्य आहेत त्यावर स्वाक्षरी करणे आवश्यक आहे.

(डॉ. विलास अ. गाडगे)
जिल्हा पशुसंर्धन उपआयुक्त,
गडचिरोली

**Approved By Committee**

अध्यक्ष
निविदा समिती
तथा
जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त
गडचिरोली

सदस्य
निविदा समिती
तथा
महाव्यवस्थापक / प्रतिनिधी
जिल्हा उद्योग केंद्र गडचिरोली

सदस्य
निविदा समिती
तथा
लेखा अधिकारी (ले. व को. विभाग) / प्रतिनिधी
जिल्हा कोषागार कार्या, गडचिरोली

सदस्य
निविदा समिती
तथा
पशुधन विकास अधिकारी
जिल्हा कृत्रिम रेतन केंद्र गडचिरोली

सदस्य सचिव
निविदा समिती
तथा
सहाय्यक आयुक्त पशुसंवर्धन
जिपउआ कार्यालय गडचिरोली

वरील सर्व नियम व अटी मला मान्य आहेत.

कंत्राटदाराचे नाव, पत्ता व स्वाक्षरी